# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी महाविद्यालयामध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**

भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्ट, जयसिंगपूर येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन दिमाखात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, प्रमुख पाहुणे महादेव आण्णाप्पा नरुटे (माजी सैनिक) यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण सोहळा पार पडला. यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व नृत्य सादर करून उपस्थितांना भारावून टाकले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सर्व मान्यवरांचे स्वागत डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील यांनी केले.

यानंतर सौ. एस. व्ही. मगदूम यांनी प्रमुख पाहुण्यांच्या लष्करी कारकिर्दीचा संक्षिप्त परिचय करून देत



त्यांच्या शौर्यपूर्ण कार्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम यांनी प्रमुख पाहुण्यांचा सन्मान पुष्पगुच्छ देऊन केला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या अद्वितीय योगदानाची आठवण करून देत विद्यार्थ्यांना त्याग व बलिदानाच्या प्रेरणादायी कथा सांगितल्या. त्यांनी स्पष्ट केले की स्वातंत्र्य आपल्याला सहज लाभलेले नाही, ते अनेकांनी दिलेल्या आहुतीमुळेच मिळाले आहे. त्यामुळे या स्वातंत्र्याचे जतन करणे व राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. या उपक्रमास संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम आणि कार्यकारी संचालक डॉ. सुनिल आडमुठे, कॅम्पस संचालक संदीप रायण्णावर, सर्व शाखांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विध्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन सौ. हिमा पडळकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.समडोळे आणि प्रा. काशीनाथ होलवान यांनी केले.